Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

Original Article

# NEP 2020 आणि व्यावसायिक संभाषण कौशल्य: गरजा आव्हाने व संधी

**आरती प्रमोद क्षीरसागर[1], डॉ. शिवाजी बापू पाटील[2]**
[1]सहाय्यक प्राध्यापक, डिपार्टमेंट ऑफ एजुकेशन,
जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर
[2]प्राचार्य, वसंतराव नाईक कॉलेज ऑफ एजुकेशन,
कळंबा, कोल्हापूर

**Manuscript ID:**
JRD -2025-170939
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9 (IV)
Pp. 193-197
Sept. 2025
**Submitted:**15 Aug. 2025
**Revised:** 25 Aug. 2025
**Accepted:** 10 Sept. 2025
**Published:** 30 Sept. 2025

**सारांश**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० )*NEP* 2020) शिक्षण क्षेत्रात सर्वांगीण बदल घडवून आणण्यावर भर देते, ज्यात संवादकौशल्याचा महत्त्वाचा भाग आहे. शिक्षक व विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक संभाषण कौशल्यांचा विकास शिक्षणाची गुणवत्ता व परिणामकारकता वाढवतो. प्रभावी संवादामुळे आत्मविश्वास, सहकार्य, व नेतृत्वगुण विकसित होतात. विविध प्रशिक्षण, कार्यशाळा व तंत्रज्ञानाचा वापर करून संवादकौशल्ये विकसित केली जाऊ शकतात. त्यामुळे शिक्षकांचे सशक्तीकरण व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो.

**महत्वाचे शब्द :** *NEP 2020*, व्यावसायिक संभाषण कौशल्य

**प्रस्तावना**

आजच्या एकविसाव्या शतकात अध्यय व तंत्रज्ञानाचा वापर करणारी पिढी आहे त्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात आणि त्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी शिक्षक अध्यायावत असणे अत्यंत आवश्यक आहे जागतिकीकरणामुळे शिक्षण क्षेत्रात अनेक बदल होत आहेत तेव्हा अशा बदलासाठी शिक्षक आणि विद्यार्थी दोघेही सज्ज आहेत या बदलांमध्ये इंग्रजी भाषेचे महत्त्वाचे स्थान आहे एकीकडे मातृभाषेवरची आत्मीयता आणि दुसरीकडे जागतिकीकरणाच्या दुनियेत भक्कमपणे उभे राहण्याची क्षमता या दोन्ही टोकांचा समतोल साधत शिक्षक आणि विद्यार्थी नवनवीन पद्धतीचा वापर करत आहेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **NEP** 2020 चे मुख्य महत्त्व हे आहे की हे धोरण भारताच्या शिक्षण प्रणालीत सर्वांगीण बदल घडवून आणण्यासाठी आहे याचा उद्देश एक सर्वसमावेशक कौशल्य आधारित आणि विद्यार्थी केंद्रित शिक्षण प्रणाली निर्माण करणे आहे. या धोरणाने 1986 च्या धोरणाची जागा घेतली असून बालपणीचे शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरावर सुधारणा प्रस्तावित केल्या आहेत.

**NEP 2020 चे मुख्य मुद्दे आणि महत्त्व**

- सर्वसमावेशक आणि लवचिक शिक्षण
- 5+3+3+4 शिक्षण रचना
- उच्च शिक्षणात सुधारणा
- तंत्रज्ञान आणि कौशल्य शिक्षकांचे सक्षमीकरण

जबाबदारी आणि गुणवत्ता समान संधी आणि सर्वसमावेशक शिक्षण

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*
Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*आरती प्रमोद क्षीरसागर, सहाय्यक प्राध्यापक, डिपार्टमेंट ऑफ एजुकेशन, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर.*

**How to cite this article:**
*आरती प्रमोद क्षीरसागर, शिवाजी बापू पाटील (2025). NEP 2020 आणि व्यावसायिक संभाषण कौशल्य: गरजा आव्हाने व संधी. Journal of Research & Development, 17(9), 193-197.*

**व्यावसायिक संभाषण कौशल्याचे महत्त्व**

व्यावसायिक संभाषण कौशल्ये (Professional Communication Skills) कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी अत्यंत आवश्यक असतात. प्रभावी संवाद केवळ माहिती देण्यासाठीच नव्हे, तर सकारात्मक संबंध निर्माण करणे, सहकार्य वाढवणे आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो.

### 1. स्पष्ट आणि प्रभावी संवाद साधता येतो

व्यावसायिक संभाषण कौशल्यामुळे आपले विचार, सूचना आणि भावना इतरांना प्रभावीपणे व्यक्त करता येतात. यामुळे गैरसमज टाळले जातात आणि काम अधिक सुसूत्रपणे पार पडते.

### 2. आत्मविश्वास वाढतो

योग्य संभाषण कौशल्यांमुळे व्यक्तीला आत्मविश्वास मिळतो. संभाषण करताना भीती किंवा संकोच वाटत नाही, त्यामुळे कोणत्याही ठिकाणी विचार मांडणे सोपे होते.

### 3. नातेसंबंध आणि सहकार्य सुधारते

व्यवसायिक जगतात सहकाऱ्यांसोबत चांगले नाते निर्माण करणे महत्त्वाचे असते. प्रभावी संवादामुळे परस्पर समज वाढते, विश्वास निर्माण होतो आणि टीमवर्क सुधारते

### 4. समस्या सोडवण्यासाठी मदत होते

संवाद कौशल्य चांगले असल्यास समस्या योग्य पद्धतीने हाताळता येतात. स्पष्ट संवादामुळे कोणतीही समस्या समजून घेता येते आणि तिला योग्य तोडगा काढता येतो.

### 5. नेतृत्वगुण विकसित होतात

एक प्रभावी नेता हा उत्तम संभाषण कौशल्य असलेला असतो. स्पष्ट संवाद, प्रेरणा देण्याची क्षमता आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळे नेतृत्वगुण वाढतात.

### 6. करिअरच्या संधी वाढतात

व्यावसायिक संभाषण कौशल्ये चांगली असल्यास मुलाखती, सादरीकरणे, ई-मेल संवाद, बैठकांमधील सहभाग आणि ग्राहकांशी संवाद या सर्व ठिकाणी यश मिळण्याची शक्यता वाढते.

### 7. ग्राहक आणि क्लायंट यांच्याशी चांगले संबंध प्रस्थापित होतात

व्यवसायात ग्राहकांशी चांगला संवाद ठेवणे आवश्यक असते. स्पष्ट, विनम्र आणि विश्वासार्ह संवादामुळे ग्राहक समाधान वाढते आणि व्यवसायाची वृद्धी होते.

### 8. तणाव आणि द्वंद्व टाळता येतात

योग्य संभाषण कौशल्यांमुळे गैरसमज, वाद आणि तणाव निर्माण होण्याची शक्यता कमी होते. संवादातील पारदर्शकता आणि सहानुभूतीमुळे समस्यांचे निराकरण करता येते. व्यावसायिक संभाषण कौशल्य हे प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी अत्यावश्यक आहे. प्रभावी संभाषण केल्याने आत्मविश्वास वाढतो, नातेसंबंध सुधारतात आणि करिअरच्या उत्तम संधी निर्माण होतात. त्यामुळे हे कौशल्य विकसित करण्यावर भर देणे आवश्यक आहे.

### संशोधनाची उद्दिष्टे

1. **NEP** 2020 आणि व्यावसायिक संभाषण कौशल्य यातील आव्हाने व संधी यांचा शोध घेणे.
2. **NEP** 2020 आणि व्यावसायिक संभाषण कौशल्य याबाबतीत शाळा व महाविद्यालयीन शिक्षकांची सद्यस्थितीचा शोध घेणे.
3. शिक्षक व विद्यार्थी यांच्या व्यावसायिक संभाषण कौशल्य वरील धोरणाचा परिणाम अभ्यासणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

**कार्यात्मक व्याख्या**

**NEP 2020: -** "राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP 2020( म्हणजे भारत सरकारने 2020 साली जाहीर केलेले शिक्षण क्षेत्रातील सर्वसमावेशक धोरण होय. या धोरणाद्वारे शालेय व उच्च शिक्षण प्रणालीत गुणात्मक बदल घडवून आणणे, कौशल्याधिष्ठित, बहुविषयक, समावेशक व नवनिर्मितीक्षम शिक्षणाला प्रोत्साहन देणे हा उद्देश आहे."

**व्यावसायिक संभाषण कौशल्य** :- "व्यावसायिक संभाषण कौशल्य म्हणजे कार्यक्षेत्रात प्रभावी संवाद साधण्यासाठी आवश्यक असलेली वाचन, लेखन, ऐकणे व बोलणे ही भाषिक कौशल्ये व त्यांचा सुयोग्य, नम्र, औपचारिक व परिणामकारक वापर करण्याची क्षमता."

**संदर्भ साहित्याचा आढावा**

**निष्ठा** या पुस्तकाच्या 18 व्या घटकात शाळा पूर्व व्यावसायिक शिक्षण या घटक संचात भारतातील कौशल्य विकासाच्या प्रमुख वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण केले आहे हा घटक संच हे कौशल्य विकास तसेच शालेय व्यावसायिक शैक्षणिक कार्यक्रमाची सध्याची स्थिती आणि भारतातील व्यवसाय आधारित शिक्षणाच्या ऐतिहासिक दृष्टिकोनाचे सर्वकष पुनरावलोकन करण्यासाठी विकसित केले आहे

**डॉक्टर पाटील राहुल अशोक** यांनी संभाषण कौशल्य स्वरूप आणि महत्त्व या विषयावर लेख चिकित्सा आहे त्यात त्यांनी संभाषणाचे स्वरूप आणि संकल्पना स्पष्ट केली आहे त्याचबरोबर आजच्या युगात असलेली संभाषणाची उपयुक्तता आवश्यकता व महत्त्व स्पष्ट केले आहे या लेखात संभाषणात येणारे अडथळे कोणते यासंबंधी मत मांडले आहे संभाषण प्रभावी करण्यासाठी उपाय हे सुचवले आहेत

**व्यावसायिक संभाषण कौशल्याचे महत्त्व**

Kaul (2000) यांच्या *Effective Business Communication* या पुस्तकात असे म्हटले आहे की, प्रभावी व्यावसायिक संवाद कौशल्य कोणत्याही व्यवसायासाठी महत्त्वाचे आहे, विशेषतः शिक्षकांच्या बाबतीत. व्यावसायिक संभाषणाच्या वेळी आत्मविश्वास, स्पष्टता, आणि श्रोत्यांशी योग्य संवाद साधण्याची क्षमता महत्त्वाची भूमिका बजावते

Bovee आणि Thill (2016) यांनी व्यावसायिक संवाद कौशल्य हे फक्त भाषेचा वापर नसून, प्रभावीपणे संवाद साधण्याची एक कला असल्याचे सांगितले आहे. शिक्षकांसाठी याचा सराव विद्यार्थ्यांसोबत आणि सहकाऱ्यांशी चांगले नाते निर्माण करण्यासाठी महत्त्वाचा असतो.

**संशोधन पद्धती**

सदर संशोधनात वर्णनात्मक व विशेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे नमुना म्हणून प्राथमिक माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरातील शिक्षकांचा समावेश करण्यात आला आहे सदर संशोधनाकरिता प्रश्नावली या साधनांचा वापर करण्यात आला आहे माहिती विश्लेषणासाठी आलेख टक्केवारी सरासरी या तंत्रज्ञानाचा वापर तंत्राचा वापर करण्यात आला आहे

**NEP 2020 आणि व्यावसायिक संभाषण कौशल्य यांचा सहसंबंध**

NEP 2020 (National Education Policy 2020) आणि व्यावसायिक संभाषण कौशल्य )Professional Communication Skills) यांचा संबंध अत्यंत जवळचा आहे. खालील मुद्द्यांमध्ये तो स्पष्ट होतो —

**१. भाषा व संवादकौशल्यावर NEP 2020चा भर**

बहुभाषिकता )Multilingualism) : NEP 2020 नुसार तिसरीपर्यंत, शक्यतो पाचवीपर्यंत मातृभाषेतून शिक्षण देण्यावर भर आहे. मातृभाषेत भक्कम पाया घातल्याने विद्यार्थ्यांचे विचार मांडण्याचे व संवाद साधण्याचे कौशल्य दृढ होते.
भाषा समृद्धी : धोरणात किमान दोन ते तीन भाषांवर प्रभुत्व मिळवण्यावर जोर आहे. व्यावसायिक पातळीवर बहुभाषिक संवादकौशल्य रोजगारसंधी वाढवते.

**२. २१व्या शतकातील कौशल्ये**

NEP 2020 ने “21st Century Skills” मध्ये critical thinking, creativity, collaboration आणि communication यांना मूलभूत मानले आहे. यातले “communication” म्हणजेच

स्पष्ट, परिणामकारक बोलणे,

श्रोत्याला समजेल असे लेखन,

डिजिटल साधनांतून संवाद साधणे.

ही सर्व कौशल्ये व्यावसायिक संभाषणाची पायाभूत गरज आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(IV)| September 2025

### ३. उच्च शिक्षण व व्यावसायिक शिक्षण

हायर एज्युकेशनमध्ये 'Skill Development' : NEP 2020 अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम )इंजिनिअरिंग, व्यवस्थापन, शिक्षक शिक्षण( यामध्ये Communication Skills अनिवार्य घटक करण्याची शिफारस आहे.

इंटर्नशिप व प्रॅक्टिकल ट्रेनिंग : उद्योग, संशोधन संस्था यांच्याशी संलग्न इंटर्नशिपदरम्यान विद्यार्थ्यांचे प्रेझेंटेशन, टीम कम्युनिकेशन, ई-मेल ड्राफ्टिंग इत्यादी कौशल्य विकसित होते.

### ४. डिजिटल युगाशी सांगड

NEP 2020 डिजिटल शिक्षणाला प्रोत्साहन देते (ऑनलाईन कोर्स, MOOCs).

ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर आभासी मीटिंग्स, ई-कॉन्फरन्सेस, वेबिनार्स यासाठी व्यावसायिक संवादकौशल्य आवश्यक आहे— स्पष्ट उच्चार, नेटिक्वेट्स, लिखित डिजिटल कम्युनिकेशन.

### ५. शिक्षक व प्रशिक्षकांसाठी

धोरणात शिक्षक प्रशिक्षणात Effective Communication हे महत्त्वाचे अंग मानले आहे. शिक्षक व्यावसायिक संवादकौशल्याने सज्ज असतील तर विद्यार्थ्यांमध्येही तेच कौशल्य विकसित होऊ शकते.

### थोडक्यात संबंध

NEP 2020 = कौशल्य आधारित शिक्षण

व्यावसायिक संभाषण कौशल्य = त्या कौशल्यांचा मध्यबिंदू

NEP 2020 ने दिलेली बहुभाषिकता, 21st Century Skills, डिजिटल शिक्षण आणि उद्योग-शैक्षणिक समन्वय या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व जागतिक पातळीवर प्रभावी व्यावसायिक संवादक बनवतात.

म्हणूनच NEP 2020 चे यश प्रत्यक्षात आणण्यासाठी Professional Communication Skills विकसित करणे हे अत्यावश्यक आहे; दोन्ही घटक परस्पर पूरक आहेत.

### विश्लेषण

- NEP 2020 बद्दल योग्य ज्ञान आहे 57.1% लोकांचे काही प्रमाणात ज्ञान आहेत व 42.97% लोकांना खूप चांगल्या पद्धतीने ज्ञान आहे
- NEP 2020 मधील बहुभाषिकता व एकविसाव्या शतकातील कौशल्य संकल्पना बाबत 50 टक्के लोकांनी प्रशिक्षण घेतलेले आहे पण 28.6% लोकांनी प्रशिक्षण घेतलेली नाही व 21.4% प्रतिसाद त्यांनी नियोजनात आहे असे मत नोंदवले आहे
- डिजिटल शिक्षण व ई लर्निंग मुळे आपली संवाद शैली बदलली आहे याबाबतीत 35.7 प्रतिसादकांनी होकारार्थी उत्तर दिले आहे
- शिक्षकांच्या व्यावसायिक संभाषण कौशल्य सुधारण्यासाठी संस्थेत कोणते ठोस उपाय सुचवाल? या बाबतीत प्रशिक्षण, परिपाठ, सांस्कृतिक उपक्रम, आंतरवासिता व व्यक्तिमत्व शिबिर मध्ये विविध उपक्रम राबवून व तज्ज्ञ मार्गदर्शक कडून कार्यशाळा आयोजित करणे, संभाषण कौशल्य प्रक्षिक्षणात सातत्य असावे, विविध तंत्र नाविन्यपूर्ण असावे, स्पेशली व्यवसाय शिक्षणासाठी मार्गदर्शन पूरक अभ्यासक्रम ,प्रात्यक्षिके इत्यादी उपाय यावरती आहेत त्याची सुरुवात इयत्ता आठवी पासून करावी, Arrange more trainings and school visit, संवाद प्रशिक्षण देण्यात यावे विविध साधनांचा वापर करून अध्यापन करण्यासाठी प्रयत्न करावे, प्रशिक्षण, शिबिर, कार्यशाळा त्याचबरोबर विविध विषयावर गटचर्चा, वादविवाद स्पर्धा, कोडी चित्र तक्ते यावरती सविस्तर माहिती सांगणे, व्यवहारिक भाषेमध्ये संवाद साधने, सकारात्मक भाषा वापरणे, समोरच्या व्यक्तीचे मत त्याचं विचार समजून घेणे, प्रत्येकाच्या मताचा स्वीकार करणे, डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करणे, व्हिडिओ ऑडिओ क्लिप्स यांचा अध्यापनामध्ये उपयोग करणे. बघितलेल्या व्हिडिओ वरती त्यांच्या स्वतःच्या शब्दांमध्ये मत मांडण्यास सांगणे. वरील सर्व बाबी या शिक्षकांच्या व्यवसायिक संभाषण कौशल्य सुधारण्यासाठी खूप उपयोगी आहेत. असे प्रतिसाद आले आहेत.
- NEP 2020 च्या उद्दिष्टपूर्तीसाठी शिक्षकांची संवादकौशल्ये का आणि कशी महत्त्वाची आहेत, यावर आपले विचार लिहा. याबाबतीत नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणात कसा करता येईल. शिक्षकांमधील वेगवेगळ्या कल्पनाचा वापर अध्यापनात कसा करता येईल यासाठी संवादकौशल्य महत्त्वाची आहेत. शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया साठी संवाद कौशल्य आवश्यक आहे, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येते, मार्गदर्शन करता येते. पिढी तंत्र स्नेही असल्याने

संवेदनशीलता निर्माण करणयासाठीव बहुभाषिक असणे आवश्यक आहे. प्रत्यक्षा केवळ थेरॉटिकल नॉलेज न घेता प्रॅक्टिकल नॉलेज घेतल्यास विद्यार्थ्यांची व्यवसायाची उद्दिष्टपूर्ती होईल. मुक्त वातावरणामध्ये अभ्यासक्रम राबविण्यासाठी उपाययोजना कराव्यात. NEP 2020 च्या उद्दिष्टपुर्ततेनुसार शिक्षकांना संवाद कौशल्य प्रभावी असणे खूप महत्त्वाचे आहे कारण शिक्षक प्रभावी संवाद करतील तरच मुले प्रभावीपणे संवाद करणे शकतील आणि आजच्या युगात संवाद हे खूप महत्त्वाचे माध्यम झाले आहे विद्यार्थी केंद्रीय शिक्षण, बऊभाषिकता, चिंतन व सर्जनशील विचार प्रक्रियेसाठी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या फल निश्चितीसाठी विद्यार्थ्यांचे वयोमानानुसार त्यांच्याशी एकरूप होण्यासाठी मानसिकतेचा विचार करून संवाद साधणे आवश्यक आहे नविन संकल्पना शिकवणं आहे त्यासाठी विविध साधनांचा वापर करताना वेगवेगळ्या पद्धतीने संवाद साधणे महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संवाद कौशल्य महत्त्वाचे आहे. योग्य निर्णय घेणे, समस्या निराकरण करणे ,सर्जनशील विचार करणे, चिंतनशील विचार करणे ,चिकित्सक विचार करणे या उच्च दर्जाच्या क्षमतांचा विकास करण्यासाठी संवाद कौशल्य महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे प्रोत्साहन देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे त्यांना सक्षम नागरिक बनवणे, ज्ञानाचं सोप्या पद्धतीने हस्तांतरण करणे एखादी माहिती सोपी करून विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेमध्ये सांगणे या सर्व प्रक्रियेसाठी शिक्षकांमध्ये संवाद कौशल्य उत्तम असणे महत्त्वाचे आहे. असे प्रतिसाद दिले आहेत

**निष्कर्ष :**

1. NEP 2020 मुले शिक्षक आणि विद्यार्थ्यांना बहुभाषिक व्यावसायिक डिजिटल संवाद कौशल्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे
2. वरील विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे भारताच्या शिक्षण प्रणालीत मूलभूत बदल घडवून आणणारे धोरण असून, त्यात संवाद कौशल्यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. शिक्षकांचे व्यावसायिक संभाषण कौशल्य सुधारल्यास विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, सामाजिक आणि भावनिक विकासास चालना मिळते. नव्या तंत्रज्ञानाचा वापर, बहुभाषिकता आणि विद्यार्थी केंद्रित शिक्षणपद्धतीमुळे प्रभावी संवाद अधिक आवश्यक ठरतो.
3. विद्यार्थ्यांना रोजगार मिळवण्यासाठी व्यावसायिक संभाषण कौशल्यावर प्रभुत्व असणे हि काळाची गरज आहे त्यामुळे त्याची आमल बजावणी होत आहे.

**शिफारसी:**

1. शिक्षकांसाठी नियमित संवाद कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित कराव्यात.
2. शाळांमध्ये संवादाधारित उपक्रम जसे वादविवाद, गटचर्चा, नाटक इ. राबवावेत.
3. शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमात "प्रोफेशनल कम्युनिकेशन" हा अनिवार्य घटक करावा.
4. डिजिटल माध्यमांचा वापर करून संवाद कौशल्य विकासासाठी विविध ई-लर्निंग साधने वापरावीत.
5. विद्यार्थ्यांमध्ये संवादकौशल्य वाढवण्यासाठी आठवीपासून संवादकेंद्रित शिक्षण सुरू करावे.

**संदर्भ सूची**

1. Government of India. (2020). National Education Policy 2020. Ministry of Human Resource Development, New Delhi.
2. Kumar, K. (2021). NEP 2020: Transforming Indian Education. New Delhi: Sage Publications.
3. Raman, M. & Sharma, S. (2019). Technical Communication: Principles and Practice. Oxford University Press.
4. Kaul, A. (2015). Effective Business Communication. PHI Learning Pvt. Ltd.